# —: प्रेस नोट :—

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, गडचिरोली येथील प्रकल्प सहाय्यक(कंत्राटी) व कार्यालय सहाय्यक(कंत्राटी) यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरोची कारवाई**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | गडचिरोली |
| पोलीस ठाणे, अप.क्रमांक, दाखल दिनांक व वेळ | पोस्टे. गडचिरोली अप.क्र ३७१/२०२६ दि. ०३ /४/२०२६ चे ०४:३१ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पद | १) ईलोसे-श्री. मंगेश मनोहर आंबोरकर, वय-४२ वर्ष, पद-प्रकल्प सहाय्यक(कंत्राटी) वर्ग-४, रा. शिवाजीनगर, रामपुरी वार्ड नं. १८, गडचिरोली,<br>२) ईलोसे- श्री. दिनेश कवडु सिडाम, वय-३८ वर्ष, पद-कार्यालय सहाय्यक (कंत्राटी), वर्ग-४, रा. वृध्द आश्रम जवळ, बजरंगनगर गडचिरोली. |
| कायदा, कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, कलम-७, १२ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/-रुत्र. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/-रु |

**थोडक्यात हकिगत,**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, गडचिरोली येथील ईलोसे क्र.-१) श्री. मंगेश मनोहर आंबोरकर, वय-४२ वर्ष, पद-प्रकल्प सहाय्यक(कंत्राटी), वर्ग-४, यांनी तक्रारदार यांना मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढुन देण्याकरीता ५,०००/-रु ची मागणी केली. व ईलोसे क्र.-२) श्री. दिनेश कवडु सिडाम, वय-३८ वर्ष, पद-कार्यालय सहाय्यक,(कंत्राटी), वर्ग-४, यांनी ईलोसे क्र. १ यांचे करीता २,०००/-रु ची लाच मागणी करून तडजोडीअंती १,०००/-रु स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने आज रोजी रंगेहात पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदाराने मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्याकरिता दि. ३१.०३.२०२६ रोजी अर्ज दाखल केला होता त्यासंदर्भात ते आरोपी क्र-१ श्री. मंगेश मनोहर आंबोरकर, वय-४२ वर्ष, पद-प्रकल्प सहाय्यक(कंत्राटी), यांना भेटले असता त्यांनी तक्रारदाराचे मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत होती, ती मुदत संपली असुन कागदपत्रे अपलोड करून जात पडताळणी प्रमाणपत्र काढुन देण्याकरीता दि. १/४/२०२६ रोजी ५,०००/-रु ची मागणी केल्याने आणि तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे दि. २/४/२०२६ रोजी तक्रार नोंदविली. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०२/०४/२०२६ रोजी पंचासमक्ष लाच मागणी, पडताळणी केली असता, आरोपी क्र-२ श्री. दिनेश कवडु सिडाम, वय-३८ वर्ष, पद-कार्यालय सहाय्यक, (कंत्राटी) यांनी आरोपी क्र-१ श्री. मंगेश मनोहर आंबोरकर, वय-४२ वर्ष, पद-प्रकल्प सहाय्यक(कंत्राटी),यांचे करीता २,०००/-रु ची मागणी करून तडजोडीअंती आरोपी क. १ श्री. मंगेश मनोहर आंबोरकर, यांना १,०००/- रु लाच रक्कम स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने रंगेहात पकडुन दोघांनाही ताब्यात घेतले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा अधिकारी** | पोलीस निरीक्षक-श्री. संतोष पाटील |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | पोलीस उप अधिक्षक-श्री विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली |
| **सापळा पथक** | सफौ/सुनील पेद्दीवार, पोहवा/राजेश पद्मगिरवार, किशोर जौजांरकर, स्वप्नील बांबोळे, पो. अं. प्रविण जुमनाके, नुतेश धुर्वे, संदीप उडान, संदिप घोरमोडे,, मपोअं/जोत्सना वसाके व चापोहवा/राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली |
| **तपासी अधिकारी** | पोलीस उप अधिक्षक-श्री विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस अधिक्षक मा.डॉ.श्री.दिगंबर प्रधान, अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर, मा.श्रीमती माधुरी बाविस्कर मॅडम, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर,<br>मा.श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर |

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणतेही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उपधिक्षक-श्री. विक्रांत सगणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांनी केले आहे.

**पोलीस उप-अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली**
**व्हॉट्सअप क्रमांक-७५८८०४१०६४.**
**दुरध्वनी क्रमांक - ०७१२-२९५०२०.**
**टोल फ्रि क्रमांक - १०६४.**

(विक्रांत सगणे)
पोलीस उपअधीक्षक
ला.प्र.वि.गडचिरोली